# प्रकरण - तिसरे

# ‘प्रार्थना दयाघना’ व ‘गंगा वाहू दे निर्मळ’ मधील आशयसूत्रे

## प्रकरण - तिसरे

# 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' मधील आशयसूत्रे

'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' मधील आशयसूत्रे या प्रस्तुत प्रकरणात कवी ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितेचे स्वरूप लक्षात घेऊन या कवितांची आशयघनता विस्तारित स्वरूपात मांडली जाणार आहे.

**प्रार्थना दयाघना मधील कवितेचे स्वरूप :-**

**१. प्रार्थना दयाघना :-**

ना. धों. महानोर यांच्या १९९० साली प्रकाशित झालेल्या 'प्रार्थना दयाघना' या दीर्घ कविता-संग्रहातून एकूण सहा दीर्घ कविता आल्या आहेत. या कवितासंग्रहातून बदलेल्या निसर्गाने स्वरूप स्पष्ट करून पाण्यावाचून सलग पडलेल्या दुष्काळाचे 'वास्तव' चित्रण आलेले आहे. प्रस्तुत कवितांमधून दयाघनाच्या कृपेने सुकाळ असताना पाण्यामुळे सुखात नांदणाऱ्या खेड्यात दुष्काळाच्या वणव्याने झालेला साऱ्या गावांचा भकास सुनेपणा अभिव्यक्त झाला आहे.

शेतीप्रधान देश असलेल्या भारतातील खेड्याची अवस्था पाण्याविना 'सुना सोन्याचा पिंपळ' अशी होऊन प्रस्तुत परिस्थितीस कारणीभूत असणाऱ्या स्वार्थी व भ्रष्ट समाजव्यवस्थेबरोबरच, राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाचा 'पंचनामा' महानोरांनी आपल्या या दीर्घ कवितासंग्रहातून केलेला आहे.

प्रस्तुत कवितासंग्रहातील 'प्रार्थना दयाघना' या पहिल्या कवितेतून महानोरांनी पावसाच्या बदललेल्या ऋतुमानाने राना-पिकांसहीत अवघ्या ग्रामीण पंढरीवरच आलेले सुनेपण व्यक्त करताना नदी नाल्यातन झुळझुळ वाहणारे पाणी संपून गेले आहे. मातीतून दरवळणारा वास ओसरून गेल्याने चैतन्य ओसांडून वाहण्याऐवजी सर्वत्र दुःखाची काळजी पसरली आहे. घराघरातून पोटासाठी माणसांचे तांडे वळलेले दिसून येत असल्याने निर्माण झालेल्या भयानक परिस्थितीचे वर्णन या कवितेतून विशद केले आहे.

**खेड्यातले चैतन्य**

**संपून चालले**

**माणसा माणसामधले**

**ऋणानुबंध हळूवार**

**कमी होत चालले**

16353

**माणसं निघून चाललेली**

**मोडक्या बैलगाडीत**

**इवलासा संसार बांधून गाठोड्यात**

**टिचलेल्या कंदिलागत**

**अधांतरी वाऱ्यावर**

**जथ्थ्या जथ्थ्यांनी**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ६)

अशा मोजक्या शब्दांमधून प्रस्तुत परिस्थिती वाचकांच्या डोळ्यासमोर उभी करून दुष्काळाने लागणाऱ्या झळांचे 'वास्तव' चित्रण महानोरांनी येथे रेखाटले अहो.

दुष्काळाच्या सावटामुळे पूर्वीसारखी गावातल्या पाराजवळ गजबज दिसत नाही की संध्याकाळी चिमण्यांच्या तोंडातून 'दिवा लावला देवापाशी, उजेड पडला तुळशीपाशी' अशी शुभंकरोतीची प्रार्थना नाही. या चिमण्या तोंडाबरोबरच रामाच्या-कृष्णाच्या गोष्टी सांगणारी आजीही आता थकलेली आहे. दु:खाच्या ओझ्याने ती सुरकुतली असून ती ही हल्ली गप्प गप्प असते.

हाडांची 'चिपाडं' झालेल्या जनावरांभोवती गिधाडांनी घातलेल्या एका एका घिरटेतून प्रस्तुत परिस्थिती अधिक गडद होत जाताना दिसते. दिवसाढवळ्या अत्याचार करणाऱ्य मस्तवाल हातांना उघड्या डोळ्यांनी पाहताना जी माणसे पेटून उठतील अशी आशा आहे, ती माणसेसुद्धा मुग गिळून गप्प आहेत. पाण्यासाठी बायका-पोरे वणवण हिंडत असताना दारूडे नवरे बायकोकडेच पैशासाठी भांडत असल्याचे चित्र स्पष्ट करून ओढ्याच्या काठाने जाणाऱ्या पांदीच्या रस्त्यावर तरण्या पोरीबाळींच्या रक्ताच्या उडणाऱ्या चिळकांड्या आणि काळीज पिळवटून टाकणारी हाक कोणालाच ऐकू जात नाही. अंधाऱ्या रात्री रंभा-उर्वशींच्या नाचगाण्याच्या तालात मनगटातील गजऱ्याच्या वासाबरोबर कित्येक प्याले रिचवित बसलेली श्रीमंत मंडळी आणि गावातील प्रत्येक ओसरीवर झोपलेले प्रत्येकजण आपापल्या जागी स्तब्ध आहेत.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याचा गाजावाजा झाला पण का कोणास ठाऊक स्वातंत्र्यापेक्षाही पारतंत्र्यतच बरे होते, अशी कबुली देणारी भावना बळावत गेली. कृषीवलांची भूमी असणाऱ्या भारत देशात सुखाचे दिवस शहराच्या वाट्याला गेले आणि खेड्यांच्या नशिबी मात्र दु:खाची झोळी आली असे सांगून,

**''आज ऋतुचक्र झपाटून बदलतय**
**वाहून जाणाऱ्या पाण्याला**
**अटकाव नाही.**
**बलवत्तर कुठल्या योजना नाहीत**
**शेतीतल्या मालाला**
**कवडीमोल नाही**
**शेतीतल्या घामाला**
**शेतीतल्या श्रमाला**
**प्रतिष्ठा नाही**
**खोलवर समजून घेतला जाईल**
**असा ओलावा नाही''**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. १२)

उपरोक्त ओळींमधून शेतकऱ्याच्या कष्टाचे चीज होत नसल्याची खंत कवी व्यक्त करतो. आपले दु:ख कोणाला तरी सांगावयाचे आहे पण ते कोणाला सांगणार असा यक्षप्रश्न वाचकांसमोर उपस्थित करून मोक्या-मोक्यावर आपल्या राजकीय पक्षांचे झेंडे रोवून प्रकर्षाने जातियतेची तेढ निर्माण करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांचा महानोरांनी येथे खरपूस समाचार घेतला आहे.

गावा-गावात भाऊबंदकीचे राजकारण आणून भावापासून भाऊ तोडणाऱ्या या गलिच्छ राजकारणाने खेडे उद्ध्वस्त केल्याचे पोटतिडकीने सांगितले आहे. आपले अस्तित्व जपण्यासाठी कोणत्याही थराला जाणारे हे पुढारी 'सफेद कॉलरवाले' म्हणून जरी जगापुढे मिरवित असले तरी देखील त्यांचा विचार आणि त्यांची प्रवृत्ती 'काळीच' आहे. त्यांनी सोयीस्कररित्या माणसा-माणसांमधील ऋणानुबंध तोडून मिळवलेली संपत्ती आणि राजवर्खी सिंहासने त्यांची त्यांनाच लखलाभ असोत असा उपरोध कवी व्यक्त करतो.

**ऋतुमान बदलून चाललं आहे आता**
**सुखकर्त्या दु:खकर्त्या**
**गढीतले भक्तिभाव**
**बंद होताहेत**

**बंद केले गेलेत त्यांचे आराधन**

**आरत्या**

**आणखी सगळाच साजशिणगार**

**मखमाली फुलांचे भरदार हार**

**ह्या देवतांच्या मूर्तीवर**

**आता विश्वास उरला नाही ......**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. १६)

देवाच्या या आंधळेपणाने, देवाच्या अस्तित्वाबद्दलच शंका उत्पन्न होत असल्याचा भाव स्पष्ट व्यक्त करून आगतिक होणाऱ्या कवीने

**चांगल्या माणसांना**

**मोडीत काढणाऱ्या**

**अग्निडाग देणाऱ्या**

**ह्या व्यवस्थेला एकदाचा**

**साष्टांग नमस्कार .....**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. १७)

असे उद्‌गार काव्यातून मांडून सद्य:परिस्थितीबददल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दळभद्री पावलांनी आपला संहार जवळ येत असल्याचे सांगत निर्लज्जपणाचेही सोयर-सुतक नसणाऱ्या या राज्यकर्त्यांना आपला हा 'टाहो' ऐकूच येणार नसल्याची मनातील सल येथे विशद होताना दिसते. महानोरांच्या कवितेतील नेमक्या शब्दरचनेमुळे कवितेची आशयघनता प्रकर्षाने मानवी मनाच्या संवेदनांचा वेध घेते.

समृद्ध खेड्याचे उद्ध्वस्त खेडे बनताना ऋतुचक्र सारखे झटपट बदलत चालल्याचे पुन्हा पुन्हा कवी सांगतो. यदाकदाचित एकविसाव्या शतकातील एखाद्या प्रतिभावंताकडून आभाळातून हवा तेव्हा, हवा तेवढा पाऊस पाडण्याचा शोधही लागेल असा आशावाद व्यक्त करतो. तुकोबा-ज्ञानोबांच्या या देशात वाल्याचा वाल्मिकी होण्याचा इतिहास असून ऋतुचक्र सारखे बदलत चालल्याचा पुनरोच्चार कवी सातत्याने करते दुष्काळाच्या सावटाने प्राप्त झालेली गंभीर सद्य:परिस्थितीही बदलू शकते असा आत्मविश्वस या कवितेतून कवीने व्यक्त केला आहे. ह्या सार्वभौम आभाळाच्या मनात आल्यास

अजूनही खेड्यात 'गोकुळ' अवतरेल म्हणूनच इथल्या खेड्यापाड्यांना आणखीनच विद्रूप करणाऱ्यांना राज्यकर्त्यांच्या तावडीतून वाचवण्यासाठी आभाळाकडे प्रार्थना केली आहे.

**हे आमच्या सार्वभौम आभाळा**
**तुच ह्या सगळ्यांचा**
**खराखुरा वाली**
**भविष्याचं सुखदुःख**
**तुझ्याच हवाली**
**सार्वभौम शक्तिमान**
**तूच आहेस**
**संजीवकच सर्वांचा**
**तुझ्याशिवाय निरर्थक**
**सगळा व्यवहार**
**दूरवर भक्कम कोसळत रहा.....**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. २१)

अशी आभाळाची थोरवी गाऊन, आभाळाकडे मागणी मागताना

**हे दयाघना आभाळा**
**तुझा काळानिळा शिरताज एकदा डोक्यावर घे**
**झाडून टाक मनातलं सगळं खळबळून**
**एकदा मोठ्यांदी**
**क्षमा कर मनापासून ह्या देशातल्या दुबळ्यांना**
**भरभरून पावसातून**
**उभा राहू दे हा देश**
**ही माणसं**
**चिडीपाखरं**
**घरट्यातून जगू दे सुखा समाधानानं**
**अंधारातून पुन्हा प्रकाशाकडे जाण्याचा**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**तुझा चिरंतन आशिर्वाद दे ....**

**कोट्यावधी प्राणांच्या प्रार्थना दयाघना ....**

**भरभक्कम ये**

**घनगर्द ये**

**चांगल्या युगांचा आरंभ घेऊन**

**माणुस म्हणुन**

**उभं राहण्याचा आशिर्वाद दे ...**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. २४, २५)

अशी प्रस्तुत कवितेतून सार्वभौम आभाळाला, दयाघनाला प्रार्थना करून पुर्वीचे खेड्याचे आबादीआबाद वैभव खेड्याला पुन्हा मिळावे अशा आशावादाचे किरण प्रस्फुटित झाले आहेत.

**२. सुना सोन्याचा पिंपळ :-**

'प्रार्थना दयाघना' या दीर्घ कविता संग्रहातील दुसऱ्या क्रमांकाच्या कवितेतून ना. धों. महानोर यांनी अष्टाक्षरी रचनेचा वापर केला आहे. पावसाविना खेड्याचे झालेले विदारक चित्र रेखाटताना पावसाच्या प्रतिक्षेत स्वाती नक्षत्रावर अवलंबून असणारे खेडे पावसाची वाट पाहून पाहून थकून गेले आहे. तर श्रावण धुँवाधार कोसळेल आणि सगळीकडे पाणीच पाणी होईल अशी आशा बाळगलेल्या श्रावणात पडलेल्या शुभ्र वैशाखी वणव्याने सगळ्या आशा पार धुळीस मिळाल्या आहेत. सगळ्यांच्या तोंडाचा घास पळाला आहे.

**खोप्यातला सावरून**

**चिडीपाखरांचा तांडा**

**नुस्ता जगण्याला आला**

**कारूण्याचा भोगवाटा**

**पोराबाळांच्या डोळ्यात**

**आर्त पाणी रूके सुके**

**दु:खांतात गणगोत**

**पार झालेले पारखे**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ३०, ३१)

निसर्गाच्या अवकृपेने उद्‌ध्वस्त होणाऱ्या खेड्यातून भकासपणाने आपले राज्य प्रस्थापित केले आहे. पूर्वी समृद्ध असलेले खेडे आणि तिथली गजबज विठूरायाला सांगताना तुझी 'ही' पंढरी आता सूनी झाली असून, पांडुरंगा आता साक्षात तुझाच विसर पडला आहे. इथला पिंपळ ही सुनासुना झाला आहे. तेव्हा हे पांडुरंगा तब्बल अठ्ठावीस युगे तुझ्या चरणी वाहणारी चंद्रभागा कुणब्याच्या शेतावर एकदा वाहू दे असे विठोबाकडे साकडे घातले आहे.

**३) पंचनामा :-**

आपल्या जातीधर्माची नीतिमूल्ये विसरून धर्मांच्या नावाखाली दंगली होऊन कित्येक जीवांना आपला प्राण गमवावा लागला. या दंगली होण्यात रस्त्यारस्त्यांवरून आपले पक्षीय झेंडे रोवून राजकारण्यांनी जातीजातींमूधन, धर्मा-धर्मातून वाढलेली रूंदीही तितकीच कारणीभूत आहे. कोणतीही ठोस योजना नसलेल्या या राजकारण्यांचा, मंत्रीसाहेबांचा दंगलग्रस्त गावांना, खेड्यांना झालेला दौरा आणि त्यांनी प्रस्तुत परिस्थितीवर केलेल्या सारवासारवीचा 'पंचनामा' कवीने आगतिक होऊन या कवितेतून मांडला आहे.

दंगलग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या मंत्र्यांच्या विमानांना दिलेल्या गिधाडाच्या उपमांतून त्यांच्याबद्दल कवितेच्या सुरवातीलाच तीव्र असंतोष व्यक्त होतो. विमानतळावर कडेकोट बंदोबस्तातून साहेबांचे विमान उतरून स्मशानशांतता पसरलेल्या रस्त्यावरून साहेबांच्या लाल दिव्यांच्या गाड्या भरधाव धावतात. त्यावेळी त्याना कोठे रस्त्यांवर पडलेले रक्तांचे सडे, रक्तांच्या थारोळ्यात पडलेल्या मढ्यांचा ढिग, अस्ताव्यस्त पडलेली हत्यारे, बलात्कारातून निघालेले माया-बहिणींचे धिंडवडे पाहून हे मंत्री हबकतात.

स्वत:ला धक्का लागू नये, आपल्यावरच कोणी नेम धरू नये म्हणून हजार पोलिसांच्या सुरक्षेत वेढलेले हे मंत्री सुरक्षित बंगल्यात या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जातात. तेथे गेल्यावर कागदांचे प्रचंड ढिगारे, मृतांचे आणि शस्त्रांचे आकडे पाहून यावरती उपाय म्हणून आम्ही हे करू. आपल्याला ते केलं पाहिजे अशी मुखद्वोगत झालेली भाषणे जनतेसमोर करून

**निर्मनुष्य शहरांच्या**
**राजरस्त्यांवरून गाड्या निघाल्या**
**शंभरेक दोनशे**
**कडेकोट बाहेर गावकुसाबाहेर**

**दुरवर विच्छिन्न**

**रडणाऱ्या, कुढणाऱ्या**

**झोपड्या ओलांडून**

**शहरा बाहेरच्या**

**नजिकच्या खेड्यावर**

**पांढरीच्या शेतात**

**'छबील्याशी सगळ्या गाड्या थांबल्या**

**लालजर्द दिव्यांच्या'**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ४५)

उपरोक्त वर्णनातून शहराजवळील खेड्यातून निवडणुकीनंतर जाताजाता कामानिमित्तच साहेबांनी टाकलेली 'चक्कर' कवितेतून वेधक उपरोध मांडून साहेबांची निष्क्रियता कवितेतील आशयाच्या दृष्टीने अधिक गहिरी होत गेली आहे.

दंगलीमध्ये पती मरण पावलेली वीसेक वर्षाची गर्भार पोरगी तोंडाला पदर लावून हुंदके देत असताना 'साहेब' घटनास्थळी पोहचल्यावर तिची आसमंत भेदून टाकणारी किंकाळी आणि लालजर्द कुंकू पुसलेले तिचे पांढरे फडफडीत कपाळ पाहून त्याक्षणी मंत्री थोडेसे भयभीत होतात. मंत्र्याबरोबर प्रस्तुत परिस्थितीचा पंचनामा करणाऱ्यास आलेला अधिकारी पंचनाम्यावरही सही करायला कागद ठेवतो तेव्हा ती सहीही करत नाही आणि काही बोलत नाही. मात्र दहा हजार रूपायांची तिला मंत्र्यांनी देऊ केलेली मदत ती मंत्र्यादेखत पेटवून देते. तिच्या या अबोल लक्षवेधी कृतीतून हे राज्यकर्ते काही सांगण्याच्याही, त्यांच्यापुढे काही म्हणणे मांडण्याच्याही पात्रतेचे नसल्याचेच या जळजळीत सत्यातून जाणीव होते. सरकारच्या निष्क्रियतेबद्दल या ठिकाणी निषेध नोंदविला आहे.

शंभर दोनशे विधवांच्या वतीने तिचा ओल्या डोळ्यांनी फोडलेला हंबरडा साहेबांच्या आणि तिरंगी झेंड्याच्या दिशेने जेव्हा वखवखतो तेव्हा महानोरांच्या दीर्घ कवितेतून अंगावर शहारे आणणारी भयानक वास्तवता प्रकर्षाने समोर येते. कवितेच्या शेवटी येणाऱ्या

**रस्ता विसरलेला**

**वेडा अधिकारी**

**माणसातला हरवलेला माणुस शोधतो आहे.**

**प्रार्थना म्हणतो आहे**

**राष्ट्रगीतामधल्या एकसंध शब्दांची**

**अथांग सर्वांची ......**

**... गर्भार पोरीच्या कागदपत्रांसाठी ....**

**वेडा माणसं धुंडतो आहे पंचनाम्यासाठी**

**- अजून पंचनामा व्हायचा आहे**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ४८)

माणुसकीचा आशय शोधणाऱ्या या वर्णनातून छिन्नविछिन्न झालेल्या सद्य परिस्थितीचे भान अविष्कृत करून महानोरांनी या कवितेतून समाजातील अपप्रवृत्तींवर प्रकाश टाकला आहे.

**४. दीपस्तंभ :-**

दीपस्तंभ या व्यक्तिचित्रणात्मक कवितेतून तत्कालिन परिस्थिती मांडून देशाचे तुकडे-तुकडे होत असताना

**शब्दात सांगता येत नाही असे आयुष्य**

**ऐंशी वर्षांच्या तुझ्या डोळ्यातला**

**लखलख प्रकाश आम्ही पाहतो**

**आम्ही पाहतो मलूल डोळ्यांनी**

**तुझ्या टवटवीत शब्दांचे तरारलेपण**

**ज्या शब्दांनी माळरान जागविले ....**

**तुझे शब्द भडकले ज्वाला होऊन**

**बेचाळीस सत्तावन्न आणखी नंतर कित्येकदा ....**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ५१)

अशा प्रेरणा देणाऱ्या व्यक्तीची आज आम्हाला भक्कम उभे राहण्यासाठी गरज असल्याचे सांगितले आहे.

**तुझ्या मंत्राची शक्ती दे**

**पंचविशितल्या म्हाताऱ्या तरूणांना**

**ताठ कणा दे**

**तुझ्या पिढीच्या स्वाभिमानाचा...**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ५३)

असे मत व्यक्त करून आमच्या आयुष्यात 'तू' दीपस्तंभाप्रमाणेच आम्हाला प्रेरणा देणारा आहेत असा आशय या कवितेतून अभिव्यक्त होतो.

**५. समुद्रापलिकडचा समुद्र :-**

ना. धों. महानोर यांच्या सातासमुद्रापार झालेल्या परदेशवारीत तिथले वैभव, समृद्धी पाहून आपल्या मातृभूमीच्या स्मरणातून तिच्या उद्धारासाठी झालेली तळमळ या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

'समुद्रापलिकडचा समुद्र' या कवितेतून कवीच्या झालेल्या इंग्लंड अमेरिकेच्या प्रवासामधून तिथली प्रेक्षणीय स्थळे, परंपरा तसेच अनेक प्रकारच्या व्यक्ती पाहून कवीच्या मनात त्यांच्याबद्दल येणारे भाव प्रतीत झाले आहे. 'गावाकडचा' हा कवी पहिल्यांदाच विमानात बसल्यावर त्याची व त्याच्याबद्दल आई आणि बायकोची झालेली भावावस्था कवितेच्या सुरवातीला येते. परदेशातील विविध प्रेक्षणीय स्थळे पाहून त्याला तुकोबा, जी. ए., बालकवी, लतादीदी इ. ची आठवण येते. त्याचबरोबर आपल्या देशावर राज्य करणाऱ्या या गोऱ्या लोकांच्या गुलामीच्या दिवसांचीही त्याला आठवण येते.

न्यू जर्सी सारख्या रेखीव घरांच्या गावात कवीच्या काव्यवाचनानंतर त्याला भारतातल्या दुष्काळास कंटाळून आपल्या मुलाकडे राहायला आलेला एक म्हातारा भेटतो. कवीच्या दुष्काळी कविता ऐकताना म्हाताऱ्याच्या डोळ्यातून घळाघळा येणाऱ्या पाण्यातून मातृभूमीवरील प्रेम व्यक्त होते. सॅनफ्रान्सिस्को विमानतळावरील आपल्या बाळाला जन्मताच सोडून दुसऱ्याबरोबर जाणारी एक बाई आणि आपले घरदार सोडून पलिकडच्या एकांतात एका क्षणात आत्महत्या करणाऱ्या स्त्रिया पाहून क्षणभर संस्कृती हा शब्द गर्भगळीत होतो.

'कॅलिफोर्निया'च रमणीय निसर्गसौंदर्य पाहून आपल्याही देशातल्या निसर्गाची अशी अनेक रूपे कवीच्या डोळ्यासमोर उभी ठाकतात. अवघ्या जगाला आदर्श ठरणारा, प्रत्येक दिवसाला नवीन आकाश बनविणारा जेट विमानामधला कॉम्प्युटरचा देश, त्यांनी केलेल्या डोळे दिपवून टाकणाऱ्या प्रगतीचे रहस्य म्हणजे शेती आणि पाणी यांच्या काटेकोर नियोजनाला त्या देशांनी दिलेले महत्त्व आहे. ते जाणून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून सृष्टी निर्माण करू पाहणाऱ्या कॅलिफोर्नियाचा कविला सार्थ अभिमान वाटतो.

तिथल्या शेतीमध्ये गॅलिलिओ, कॉर्व्हरचे तत्त्वज्ञान सांगणारा सामान्य माणूस पाहून या विसाव्या शतकात गर्वगीत गाणारा कोलंबस पाहिल्याची भावना या कवितेच्या निमित्ताने कवी उद्धृत करतो.

**कॅलिफोर्निया,**
**तुझ्या तांबड्या लाल मातीचा**
**टिळा मी लाविला भरदार कपाळी**
**अहंकार विसरून ......**
**..... हे कॅलिफोर्निया**
**तुझ्या तजेलदार मातीचा**
**टिळा लागू दे**
**माझ्या गलथान विचारांना**
**माझ्या खेड्यात**
**माझ्या प्रदेशात**
**सुखाचा समृद्धीचा दिवा लागू दे**

(प्रार्थना दयाघना, पृ. क्र. ७८-८०)

तुझ्यासारखी प्रगती, तुझ्यासारखी समृद्धी आमच्याही भारत देशात नांदावी असा आशय अभिव्यक्त करून कॅलिफोर्नियाला आपल्या देशात पाहुणा म्हणून येण्याकरीता दिलेल्या आमंत्रणाच्या प्रतिमेतून त्यांची प्रगती, तेथील अत्याधुनिक तंत्रज्ञान आपल्याकडे स्वीकारले जाईल असा आशावाद महानोर व्यक्त करतात. भारताची कॅलिफोर्नियाबरोबर बरोबरी साधताना ज्ञान आणि विज्ञान या दोन्हींच्याही तुलनेत आपल्या देशाच्या मागासलेपणाचे वास्तव चित्रण अधिक प्रगल्भ व प्रभावीपणे मांडले आहे.

**६. नक्षत्रांमधून नक्षत्रे सरतात :-**

'प्रार्थना दयाघना' या दीर्घ कविता संग्रहातील सहाव्या क्रमांकाच्या या कवितेतून रोहिणी नक्षत्रातल्या झालेल्या पावसामुळे रानातील पिके-पाने आनंदाने बहरू लागली आहेत. एकूणच या चैतन्यमयी वातावरणात कवी जेव्हा आकाशाकडे बघून आकाशाशी, हिरव्याकंच रानांशी संवाद साधू लागतो तेव्हा त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या स्त्रिया कवीला 'वेडा' ठरवतात. शब्दांच्या प्रेमात पडलेल्या कवीने स्वत:चे हे वेडेपण जपताना कित्येक पुस्तके चोरून वाचल्याची आठवण सांगितली आहे.

निसर्गावर भरभरून प्रेम करणाऱ्या या कवीने एकदा जीवाला त्रासून सोडणारा हा संसार सोडून देण्यासाठी केलेला निर्धार अनेकदा मायाजाळात गुंतून मागे घेतला. भोवतालच्या वास्तवापासून स्वत:ला कोठेतरी शांत ठिकाणी, वेगळ्या वाटेवर घेऊन जाणारी कवीची वृत्ती या कवितेतून चित्रित झालेली आहे.

ना. धों. महानोर यांची सुरूवातीच्या लेखनकाळातील रोमँटिकतेकडे झुकणारी काव्य प्रवृत्ती हळूहळू बदलत जाऊन समाजातील आलेल्या भयानक अनुभवांमुळे 'प्रार्थना दयाघना' या दीर्घ कवितासंग्रहाच्या निमित्ताने आलेल्या त्यांच्या दीर्घ कवितांमधून ग्रामीण जीवनातील वास्तवता अधिक विस्तृत आणि चिंतनशील बनलेली दिसून येते.

### २) गंगा वाहू दे निर्मळ :-

'गंगा वाहू दे निर्मळ' या ना. धों. महानोरांच्या २००७ साली प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहात एकूण बत्तीस कविता असून यातील निम्म्याहून अधिक कविता ह्या दीर्घ कविता आहेत. या दीर्घ कवितांमधून त्यांच्या स्फूट कवितेप्रमाणेच परंतु अधिक चिंतनाच्या पातळीवर जीवनाच्या बदलत्या रूपावर प्रकाश पडलेला दिसून येतो.

प्रस्तुत कवितासंग्रहाच्या सुरवातीच्या अकरा स्फूट कवितांमधून महानोरांनी विनटलेली वनराई, झऱ्यातून झरझरणारे निळेशार पाणी, गर्द झाडी, रिमझिमणारा पाऊस, कोजागिरीच्या रात्री पडणारे टिपूर चांदणे अशा निसर्गाच्या अनेकविध पैलूंना टिपून आनंदी संसाराचे रेखाटन नेमक्या शब्दातून साकारले आहे.

**ही वाट जुनी**
**वहिवाट जुनी**
**डोळ्यात तरळते पाणी**
**ओठांवर रिमझिम**
**मृदूल स्वरांची**
**हिरवी जीवन गाणी**
**अश्विनातील मंद गंधित गार वारा**
**ज्वारीच्या कणसातला हलका शहारा**
**गर्द बांबूच्या वनातिल शीळ हलकी**
**काजवे आकाश वेळून फेर धरती**

(गंगा राहू दे निर्मळ, पृ. क्र. १/६)

अशी काव्यरचना करून हिरवाईने नटलेल्या या निसर्गातून किंबहुना कवीच्या 'माहेर घरातून' येणाऱ्या अनुभवांची प्रतिती ही महानोरांची मुख्य अभिव्यक्ती असून ग्रामीण मातीशी, तिथल्या निसर्गाशी त्यांचा एक अनोखा ऋणानुबंध आहे. एकूणच निसर्ग हा महानोरांच्या जीवनाचा अनिवार्य असा भाग बनून राहिला आहे.

अनुक्रमे बाराव्या व तेराव्या कवितेतून पावसाच्या प्रदीर्घ दडी मारल्याने झाडे निष्पर्ण झाली आहेत. खेड्यातील अनेक लोकांनी आपापली घरे सोडून शहरांची वाट धरली आहे. तर काहींनी आत्महत्या करून आपली जिवित यात्रा संपविली आहे. खेडी उद्ध्वस्त होत चालली असून ह्या सर्व घटना म्हणजे जिवंतपणी भोगाव्या लागणाऱ्या मरणयातनाच आहेत.

**गाव उद्ध्वस्त गढीच्या**
**गेल्या कोसळून भिंती**
**पंख विसरून नारी**
**वैकुंठाला घेर घेती**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. १२)

रानात दाना नाही, घरात प्यायला पाणी नाही, मुक्या जनावरांचा आर्त हंबरडा आणि चिल्ल्या-पिल्ल्यांची सुकलेली तोंडे हे संसारातील वांझोटे जगणे कोणाला सांगणार ? ह्या असाह्य वेदना सांगायला आता तितका त्राणच उरला नाही. आपले मोडके घर आणि रिता संसार चालवतानाच डोळ्यातून दुष्काळी वणव्याचे मरण दिसत आहे. डोळ्यातून वाहणारी गंगा थांबत नसल्याच्या करूणामय आशयाची चर्चा प्रस्तुत कवितांमधून आलेली आहे.

उपरोक्त दोन कविता जरी स्फूट कविता असल्या तरी त्या इतर स्फूट कवितांपेक्षा आशयाच्या दृष्टीने वेगळ्या असून या कवितांमधून महानोरांच्या कवितेतून येणाऱ्या उपरोधाची धार पुढे येणाऱ्या त्यांच्या दीर्घ कवितांतून उत्तरोत्तर अधिक तीव्र होत गेल्याचे जाणवते. महानोरांच्या या दोन कवितानंतर येणाऱ्या दीर्घ कविता अधिक प्रौढ, प्रगल्भ, जाणीव संपन्न आणि 'वास्तव' परिस्थितीचे वर्णन करणाऱ्या आहेत.

चौदाव्या कवितेतून आभाळाच्या प्रतिवर्षी मोकळ्याच हेलपाटे मारण्याने सलग दुष्काळ पडून खेडी उद्ध्वस्त झाली आहेत. शेती, घरे, माणसे या सगळ्यांची अवस्था छिन्नविछिन्न झाल्याने गावात कुठे चिटपाखरूही नाही. करपून गेलेल्या अशा या उदास सुनसान खेड्यांमधून पावसाविना सगळ्यांच्या

तोंडचे पाणी पळाले आहे. पाण्यावाचून गुरे-ढोरे आणि माणसे जगणारच कशी अशा संभ्रमित प्रश्नाने आभाळाला आपली दया यावी व आभाळ कोसळून सगळ्यांना समृद्धी मिळावी अशी प्रार्थना कवीने आभाळाकडे केली आहे. हे आभाळ मनसोक्त कोसळल्यानंतर

**हे आभाळ**
**हे आभाळ एक एक बिथरून गेलेलं**
**संपूर्ण काळंकुट्ट विटकरी झालेलं**
**अहंकारी आकाशातले हे विमानांचे तांडे**
**भेदरून टाकताहेत उगवत्या रानाला**
**नव्या फुलणाऱ्या हिरव्यागार कोंभाला**
**यांचा काळाकुट्ट धुराडा**
**पीकपाण्याला ..........**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. १५)

ढेकळांच्या गर्दीतून चित्कार करणाऱ्या कोंभाला नवी पालवी फुटेल, राने हिरवीकंच होतील, खेडी आबादीआबाद होऊन सुखाने नांदू लागतील याच आशावादातून येणाऱ्या अनुक्रमे पंधराव्या व सोळाव्या स्फूट कवितंमधून खेड्यातील समस्त शेतकऱ्यांनी एकत्र येवून पाण्याचे मोल समजाऊन घेऊन अवघी धरणी सुजलाम् सुफलाम करूया अशी आशा बाळगली आहे. आनंदाचे समृद्धीचे आणि महात्मा गांधींच्या स्वप्नातील शांतीचे खेडे उभा करण्याचे आवाहन केले आहे. या पावसाळी दिवसात पेरणी झाल्यावर मातीतून अंकूर फुटल्याने साऱ्या दुनियेच्या पोटाची काळजी मिटेल आणि याचं पुण्य शेतकऱ्याच्या पदरी पडेल.

मृगाचा बरसणारा पाऊस शेतकऱ्यांच्या दृष्टीने स्वर्गसुखाचाच सोहळा आहे. घुंगराच्या तालात बैलांनी केलेल्या मातीच्या मशागतीतून मोती पिण्याची प्रक्रिया चालू असते. त्यावेळी बरसणारा पाऊस जमिनीवर येताना अवघं रानविश्व हरखून, सुखाऊन गेल्याचा भावाविष्कार सतराव्या स्फुट कवितेतून व्यक्त होतो.

**पीक आले भरा**
**पोटी ओटी भरा**
**घरधनी आज भल्ते खुशीला**

**हात हातातले**

**सोडवेना सये**

**पापण्यांच्या कडा चिंब झाल्या**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. २१)

अशी प्रीत भावना कवितेतून मांडून चोहीकडे दाटलेले हिरवे मळे, संथ वाहणाऱ्या झऱ्याच्या सोबतीला पावसाळी गारवा अंगाअंगात भिनला आहे. आकाशातून कोसळणाऱ्या पावसाचे मातीशी होणाऱ्या मिलनाच्या वर्णनात नवी इरकली नेसून, गजरा माळून, कुंकवाची चिरी भाळी लेऊन साजशृंगार केलेल्या सखीचे रूप अठराव्या स्फूट कवितेतून येते. आनंदात नाहून निघणारा 'संसार' कवीने प्रस्तुत कवितेतून नेमक्या शब्दात साकारला आहे. एकोणिसाव्या स्फूट कवितेतून ह्याच आनंदाने ही सखी आपल्या घरधन्याला औक्षण करते. आता हा सरलेला दुष्काळ पुन्हा कधीच येऊन देऊ नकोस तेव्हा हे आभाळा ! तुझी आमच्यावर अशीच कृपा राहू दे अशी प्रार्थना करते.

या काव्यसंग्रहातील विसावी कविता

**एकदा चिमणी अलगद तिच्या खांद्यावर आली**

**चिवचिव बोलून नकळत दूर निघून गेली**

**दूर कुठे आकाशात गजबज मेघुटात ...**

**चिमणी नंतर कधी दिसलीच नाही अंगणात**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. २३)

अशा वर्णनातून रानाशी नाते सांगणाऱ्या शेतकरी कुटूंबाचे, त्यातील प्रत्येक घटकाचे पशुपक्ष्यांवरील प्रेम त्यांच्या दररोजच्या वावरामुळे त्यांच्याबद्दल जाणवणारी तळमळ 'चिमणी'च्या प्रतिकातून दाखवली आहे. आनंदाने भरलेल्या या संसारातही रानातील चिमणीचा वाटा असल्याचे स्पष्ट होऊन ही कविता नकळतच भावनिकतेला हात घालून जाते.

यानंतर येणारी एकविसाव्या क्रमांकाची दीर्घ कविता कवीच्या पत्नीच्या अकाली मृत्यूने झालेल्या त्याच्या वैफल्यग्रस्त मनाचे चित्रण केलेले दिसते.

पत्नीच्या जाण्याचे दु:ख जिव्हारी लागून पत्नीविना ह्या घराला घरपणच राहिले नसलेचे सांगून तुझ्या जाण्याने समुद्रासारखे भरून येणारे माझे डोळे तुझ्या आठवणीत कुढत नसतात, आपल्या संसाराचे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आपण उभे केलेले सुंदर घरटे सोडून जातना आपल्या पाखरांची चिवचिव आणि त्यांचा हंबर तुला कसा कळत नाही ? अशा शब्दांतून पत्नीशिवाय हा संसार, हे प्रचंड जीवनच व्यर्थ असल्याची खंत महानोर या ठिकाणी व्यक्त करतात.

**....... या पायवाटेवरलं**
**तुझं अर्ध्यावरलं निघून जाणं**
**भयानक जिवघेणं .....**
**या चिमणी-पाखरांना पंखात घेतलं**
**अंगभर कुरवाळलं**
**तरी थांबत नाही त्यांचा करूणार्त हंबरडा**

(गंगा वाहू हे निर्मळ, पृ. क्र. २४-२५)

कवीने अशा मोजक्याच शब्दांतून वडिलांनी त्यांच्यापरीने मुलांना कितीही आईची माया दिली तरीही मुलांच्या दाटून येणाऱ्या कोरड्या कंठाची वास्तव भावावस्था स्पष्ट केली आहे. गजबजलेल्या संसारातून पत्नीच्या अशा अवेळी जाण्याने तिने आपल्या सोबत घरात टेवलेले पहिले पाऊल, बहरत गेलेला संसार ...... अशा भूतकाळातील आठवणींनी, येणाऱ्या विचारांनी कवीचे मन विषण्ण होऊन जाते. स्वप्नात भेदरून उठणाऱ्या मुलांना कितीही प्रेमाची पांघर घातली, तुझी आठवण न येऊ देण्याचे प्रयत्न केले तरीही ती फुलांसारखी संध्याकाळी कोमेजतातच. अशा आशयातून जीवनानुभवातील नानाविध टप्प्यांवरील कडा आणि त्यांचे कंगोरे महानोरांच्या दीर्घ कवितेतून अभिव्यक्त होताना दिसतात.

**तुला कसं सांगू ?**
**भिंतीआडच्या अंधाऱ्या पडवीत**
**गळाभर दाटलेला हुंदका कुणाचा ?**
**तुझ्या ओळखीचा**
**गळ्यात गळा घालून जगलेल्या संसाराचा**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. २५)

स्त्रियांना आपले मन मोकळे करण्यासाठी निदान रडता तरी येते, पण घरधन्याला मोठी जबाबदारी पार पाडावी लागते. तोच जर दु:खाने कोसळला, रडला तर आपल्या चिमुरड्यांना उद्याची पहाट कोण

दाखविणार ? असा मनाला पडणारा प्रश्न उपस्थित करून आपल्या सोबत सात जन्म येणारी पत्नी आपल्याला संसाराच्या अर्ध्या वाटेवरच सोडून गेल्यावर मानवी मनाला होणाऱ्या दुखऱ्या वेदना शब्दांतून सुद्धा कोणापुढे व्यक्त करता येत नाहीत. याचे हे वर्णन साक्ष देणारे असून मानवी मनाची होणारी घुसमट प्रस्तुत कवितेतून अधिक वेधक होताना दिसते.

स्वत:च्या मनावर दगड ठेऊन जगासाठी, मुलाबाळांसाठी का होईना पण हा जगण्याचा रहाट जगावाच लागणार असून हे परमेश्वरा आता माझ्या घरट्याला वादळ, वारा, पाऊस यांनी विस्कटून देऊ नकोस. अशा प्रतिमेतून मला अधिक खचू देऊ नकोस, तु मला सावर असे प्रतीत करून जीवनातील एक विदारक कटू सत्य महानोरांनी आपल्या पुढे मांडले आहे.

यानंतर येणाऱ्या बावीसाव्या क्रमांकाच्या कवितेतून दिवस मावळतेवेळी, पिवळसर लालसर सूर्य आणि त्याची किरणे हळूहळू अंधारात विरून जाताना पक्षी आपल्या घरट्याकडे परत फिरतात. अशा सूनसान कातरवेळी कवीचे मन आपल्या पत्नीच्या आठवणीने भरून येते. तिची आठवण त्याला बोचरी होऊन सतावते, त्याला अस्वस्थ करते. अशा या भयानक कातरवेळी पिंपळपानातून एखादा पक्षी केविलवाण्या पंखाने फडफडतो. या केविलवाणी फडफडणाऱ्या पक्ष्याच्या प्रतिकात्मक आशयातून विधूर पुरूषाच्या मनातील उठणारा भावभावनांचा कल्लोळ, त्याची होणारी अबोल घालमेल अतिशय वेधकतेने टिपलेली आहे. या कवितेतून तुळशी वृंदावनातला दिवा लावताना विझू नये म्हणून पदराने वारा थोपविणारी पत्नी, तिच्या असंख्य आठवणी आणि तिचा स्वप्नातील वावर कवितेतून सिद्ध केला आहे.

महानोरांच्या जन्मच पळसखेडसारख्या खेड्यात झाला. हे खेडे म्हणजे दुष्काळाने वेढलेल्या भुंड्या माळरानावर वसलेले गाव. पाणी, समृद्धी या बाबतीतल्या मागासलेपणोबरोबरच महानोरांची आर्थिक परिस्थितीही गरीबीचीच. लहानपण खेड्यातच गेल्याने त्यांना खेड्याबद्दल विलक्षण प्रेम आहे. उभे-आडवे आयुष्य जगताना अनेक मानापमानाचे प्रसंग आले, परदेशवारीच्या निमित्ताने दुरदेशी गेल्यावरही गावाकडल्या शेतीवरचे, तिथल्या माणसांवरचे त्यांचे प्रेम कमी झाले नाही. उलट आपल्या-वरील घडलेल्या संस्कारांनी आपणाला खेड्याशी अधिकच घट्ट बांधून ठेवल्याचे महानोर सांगतात.

या दगडधोंड्यांच्या माळरानावर वाढतानाच दूर आकाशी उगवणाऱ्या सूर्याचा इतरांना प्रकाश देण्याचा आदर्श घेऊन माझ्या कविता जन्माला आल्या. रानामाळातून, शिवारातून गरिबीतला तुकोबा-विठोबा दिसला असे सांगताना माझ्या कविता लिहिण्याला, माझ्य शब्दांबरोबर रूंजी घालणाऱ्या या

विलक्षण वागण्याला अशिक्षित आई-वडिलांनी, सभोवतालच्यांनी प्रखर विरोध केला, आयुष्यात कधीच कुणाला मी दुखवले नसल्याने त्यांनाही मी कधी त्याबद्दल बोललो नाही. दैवाने जे जे पदरी बांधले आहे त्याच मुकाट स्वीकार केला आणि माझ्या लेखणीतून ह्या कविता अलगद उतरल्या असे कवी येथे सांगताना दिसतो. निसर्गाच्या सानिध्यात राहून तिथल्या मातीशी आपली नाळ जुळली असल्याचा आशय आपणास उपरोक्त कवितेतून पहावयास मिळतो.

यापुढे योणरी चोविसाव्या क्रमांकाची दीर्घ कविता अवघ्या भारत देशाचा घात केलेल्या धर्म आणि समाजव्यवस्थेचा तिरस्कार करताना दिसते. महानोर आपल्या कुटूंबाबरोबर प्रवास करीत असताना रस्त्याशेजारी एका विस्तीर्ण वडाच्या झाडाखाली एक काळीकुट्ट बाई पाहून महानोरांच्या पत्नीने गाडी थांबवून तिची चौकशी केली. अंधश्रद्धेने गुरफटलेल्या धर्मांची जातींची बंधने मानणारी ती एक बाई .... उघड्याच स्तनानी हातातल्या छिन्नीने दगडाला आकार देत असलेली ती बिचारी सकाळपासून घडविलेल्या वाटा-वरवंटा, छोट्या-छोट्या देवांच्या मुर्ती विक्रीस मांडून बसली होती. मात्र सकाळपासून एकाही माणसाने या दगडी वस्तूंना न मागितल्याने ती हिरमुसून बसली होती. पोराबाळांना अन्न घालायला तिला चार पैसे यातूनच मिळणार असल्याचे तिच्या निरागस व्याकुळ झालेल्या डोळ्यातून जाणवत होते. अशी सारासार वर्णनातून स्वातंत्र्यानंतरही देशाची पूर्वीसारखीच राहिलेली अवस्था या कवितेतून प्रकर्षाने जाणवून येते.

यदाकदाचित तिला पैसे मिळावेत, तिच्या अवतीभोवती घट्ट मिठी मारणाऱ्या उघड्या-नागड्या पोरांच्या पोटात दोन घास जावेत याच आशेने महानोरांच्या पत्नीने एक लहानसा महादेव आणि त्यासोबत त्याहूनही लहान असा नंदी घेतला असावा. उरलेले पैसेही महानोरांनी तिलाच देऊ करून गाडीतल्या खाण्याच्या वस्तूही तिच्या पोरांच्या हातात ठेवल्या तेव्हा,

**स्वातंत्र्यानंतरही**
**आमचं भटक्याच जिणं**
**हे वणवण भटकणं**
**थांबवलच नाही कोणी**
**पुष्कळ अधार घेऊन पाहिला सर्वत्र**
**चोर समजून आम्हा जवळच घेत नाही कोणी**
**आम्ही अडाणी माणसं**
**आपलं म्हणून आमच्यावर विश्वासच ठेवत नाही कोणी**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ३२)

अशा शब्दातून जीवनव्यथा व्यतीत होताना या कवितेतील हे जळजळीत सत्य पाहून 'दगडाचा सुद्धा देव' घडविण्याची कला अंगी असणारी पण आपल्या मुलाबाळांचे आयुष्य न घडवू शकणारी तिची चित्तरकथा आपणासमोर येते.

वास्तविक पाहता भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. अशी प्रार्थना करणारे आपण सारेच जण अशा लोकांना, समाजांना वाळीत टाकण्यास कारणीभूत आहोत. स्वातंत्र्यानंतर आज त्यांची वणवण भटकंती बंद होऊन शासनाकडून त्यांना हक्काची घरे मिळावयास हवी होती. मात्र श्रीमंतीची श्रीमंतीशी सोयरिक होत असून गरिबी गरिबीलाच घट्ट मिठी मारत आहे. चोर-लफंगे म्हणून त्यांच्या माथी मारल्या जाणाऱ्या ह्या दळभद्रेपणातून समाजव्यवस्थेत असलेल्या या विभाजक दरीच्या अस्तित्वाची जाणीव या कवितेतून होते.

**उंच उंच आकाशात दगड धोंडा फेकून**
**अल्लद छातीवर झेल घेणारे बहाद्दूर**
**टोकरांच्या दोरीवर अल्लद चालणाऱ्या पोरी**
**हे डोंबारी, खेळताना मरण कवटाळून छातीवर**
**तेंडूलकर, गावस्कर, सानिया, सगळेच**
**थोर थोर बहाद्दूर ....... काही प्रश्नच नाही**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ३४)

अशा उपरोधातून स्वातंत्र्याच्या हिरक महोत्सव वगैरे साजरा करणारी आपली शासन व्यवस्था मात्र दगडालासुद्धा 'देवपण' आणणाऱ्या माणसांना साधे 'माणुसपन' सुद्धा देऊ शकलेली नाही हे विधायक सत्य प्रकर्षाने प्रस्तुत कवितेतून सामोरे येते. अनुक्रमे पुढे येणाऱ्या पंचविसाव्या कवितेतून ना. धों. महानोरांची परदेशवारी आणि तेथील अत्याधुनिक प्रगतीची विस्तारीत चर्चा झाली आहे. प्रचंड हिरवाईने सजलेल्या इस्त्राएलमध्ये पाण्याच्या थेंबाथेंबाला महत्त्व देऊन उभी केलेली वनराई पाहताना रानारानातून ज्ञान-विज्ञानाच्या जोरावर केलेली प्रगती पाहताना इथल्या नैसर्गिक समृद्धीपुढे कवी नतमस्तक होतो. हे सारे वैभव डोळ्यात साठवून आपल्या देशातही अशी प्रगती करण्याचे स्वप्न कवी पाहतो.

गाझापट्टीच्या प्रदेशात झुळझुळणारे पांढरे शुभ्र पाणी, झाडांची लेणी अशा शब्दातून इथल्या सौंदर्यांचा उल्लेख येतो. तिथल्या निळ्याभोर आकाशातून घरघरणारी विमानांची गर्दी न्याहळताना प्रदुषणाने निसर्गाचा समतोल बिघडू पाहणारे प्रगतीचे दुसरे रूप पाहून मनाला घरघर लागाल्या वाचून राहत नाही.

'जेरूसलेम' शहरात असणाऱ्या मंदिरात क्रूसावरच्या खिळ्यांना बांधलेला रक्तबंबाळ येशू पाहून क्रूसावरचे खिळे सर्वांगाला लागून होणाऱ्या वेदना जाणवतात. येशूचे आयुष्य संपविणाऱ्या निर्दयी माणसांना काय मिळाले असेल असा दीर्घ विचार करून वरदान आणि शाप ठरणाऱ्या प्रगतीची दोन्हीही रूपे या कवितेतून आविष्कृत होताना दिसतात.

सत्ताविसाव्या कविता कलाकृतींच्या अजिंठा परिसरात वाढलेल्या ना. धों. महानोरांनी टिपलेल्या अजिंठ्याच्या सौंदर्याचा परामर्श घेते.

अजिंठ्याच्या कोरीव लेण्या आपले वैभव आहेत. डोंगर दरीतून अजिंठ्ययाच्या पायथ्याशी पडणारे पांढरे शुभ्र पाणी दिवसेंदिवस आटत चालले आहे. अजिंठ्याच्या परिसरात सजलेली डोंगरझाडी हळूहळू नष्ट होत चालली आहे. अजिंठ्याच्या सौंदर्यात भर घालणारे अजिंठा परिसरात वावर असणारे प्राणी-पक्षीही आता पूर्वीसारखे दिसत नाहीत. औद्योगिकीकरणाच्या नावाखाली होणारी प्रचंड वृक्षतोड पाहून हे सौंदर्य पुसून टाकण्याची भिती प्रस्तुत कवितेतून व्यक्त झाली आहे.

स्वर्गाहुनही सुंदर अशा इथल्या कलाकुसरीवर थेंब-थेंब पाणी ओघळत जाऊन या संबंध जगाचे वैभव ठरणाऱ्या लेण्या त्यांच्या देखभालीविणा एकदिवस नष्ट होतील, हे बुद्धदेवा ! जगाला भुरळ पाडणाऱ्या तुझ्या मुर्तींच्या या सुंदर लेण्यांनी नटलेल्या परिसरात व्यापाराच्या निमित्ताने अनेक व्यापारी पेठा उभ्या राहत आहेत. करोडोंच्या जडजवाहिऱ्यांच्या वाढत जाणाऱ्या व्यापारामुळे ह्या सुंदर लेण्या काळवंडतील काय ? अशी काळ बदलत असल्याची जाणीव प्रस्तुत कवितेतून महोनारांनी करून दिली आहे. आजपर्यंत जर्मन, जपानसारख्या आणि अनेक पर्यटकांनी करोडोंनी मदत करून सुद्धा हे बुद्धदेवा तुझ्या विचारांचे विद्यापीठ या परिसरात कोठेही उभे राहिलेले नाही. तुझा विचारच तळागाळापर्यंत अजून पोहचला नाही.

आमची विश्रामगृहात थाटात बसणाऱ्या पुढाऱ्यांबद्दल तक्रार नाही, किंवा आजूबाजूला वाढणाऱ्या ढोंगी लोकांच्या मठाबद्दल तक्रार नाही. तुकोबा - ज्ञानोबा-एकोबा आणि गाडगेबाबांसारखे माणसामाणसांतून 'देव' मानणाऱ्या संत मंडळींनीही कोठे मठ उभारल्याचे ऐकिवात नसल्याचे सांगत या वाढत असलेल्या अंधश्रद्धेच्या प्रमाणाबद्दल तीव्र उपरोध व्यक्त केला आहे. उसळणाऱ्या दंगलीतून गमवत असलेले कित्येक प्राण, फोफावत असलेली स्वार्थी वृत्ती, भ्रष्टाचाराची खोलवर रूजणारी मुळे या सर्वांचा वणवा वाढत चाललेला आहे. अशा नेमक्या शब्दातून सद्य भयावह परिस्थितीचे गांभीर्य या कवितेतून अभिव्यक्त होते.

या सत्याला आम्ही कोणीच थोपवू शकत नसल्याचे सांगून आता हे बुद्धदेवा जगात शांतता समृद्धी नांदण्यासाठी

**गौतम राजा सर्वत्र काळोख वाटतो आहे भन्नाट**
**तू कुठलाही अवतार घेऊन पुन्हा एकदा ये ....**
**रात्र रात्र वैशाखात डोळे जाळणारा**
**कभिन्न काळोखात वणवा**
**असाच पेटलाय सर्वत्र**
**धर्मा धर्माचा, नीती-अनितीचा**
**साळसूद बुरखा पांघरून**
**भ्रष्टाचार फावण्याच**
**तू ये ..........**
**बाहेर तुझी मी वाट पाहतो ........**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ४१/४२)

अशा शब्दातून महानोरांनी बुद्धाला तू पुन्हा एकदा करोटा घेऊन जन्माला यावेस. आज तुझे विचार पटवून देण्याची वेळ असल्याचे सांगून बुद्धाकडे करूणार्त प्रार्थना केली आहे. लाखो जीवांचे आयुष्य तुडवून विस्तारवादी साम्राज्ये उभी करण्यास निघालेल्या प्रस्थापितांना ही कविता पुढे येणाऱ्या धोक्याचे भाकीत ठरते.

आपल्या आईच्या मृत्यूनंतर येणाऱ्या आठवणींचा मायेचा पांघर ना. धों. महानोरांनी सत्ताविसाव्या व अठ्ठाविसाव्या कवितेतून सविस्तर मांडला आहे. आईच्या आठवणीने मनाची होणारी कालवाकालव प्रस्तुत दीर्घ कवितेतून प्रकट केली आहे.

महानोरांची आई रानात जाताना आपल्या डोक्यावरील टोपल्यातून रानात लागणारे विळा, खुरपे, भोकरी, पाण्याने भरलेला मातीचा घडा इ. वस्तू घेऊन जायची.

कविच्या रानातील कडूनिंबाच्या सावलीला ती येवून बसायची. चिमण्या-पक्ष्यांना प्यायला पाणी असावे म्हणून झाडावर फांदीला पाण्याचा आणलेला घडा शिंकाळ्यात ठेवायची किंवा तेलचटणीचा तुकडा मुंग्यांना टाकायची. अशा वर्णनातून महानोरांच्या कवितेतून अस्सल ग्रामीणता प्रभावीपणे प्रकट होते. तर आई रानात पोहचताच दोन पाळलेली कुत्री आईभोवती पिंगा घालायची.

आई त्यांना भाकरीचे तुकडे टाकायची. आपल्यातीलच घटक होऊन बसलेल्या या मुंग्या, चिमण्या, पक्षी, कुत्री अशा मुक्या प्राणी-पक्ष्यांच्या सान्निध्यातून ग्रामीण संस्कृतीचा रांगडेपणाचा आविष्कार प्रस्तुत कवितेतून अभिव्यक्त होताना दिसतो.

**आई नसताना**
**आता शेतावर फिरताना**
**डोळे उदास होतात**
**कडूनिंबाच झाड वाळून**
**सुरकुत्या पडलेलं**
**तिचं रानातलं गणगोतं**
**झाडालगत कुठे दिसतही नाही**
**शिंकाळीची दोरी, कुठे मुंग्यांच्या वाटा नाहीत**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ४५)

आईच्या मृत्यूनंतर मात्र आता रानात सर्वत्र भेगा पडलेल्या आहेत. आई ज्या कडूनिंबाच्या झाडाच्या सावलीत बसायची ते झाडही आता वाळून गेले आहे, कुठे मुंग्यांची रांग नाही, कुत्र्यांचा शेपूट हालवित लाडीवाळीकपणे वावर नाही. असंख्य गोतावळा असूनही हे भकासलेपण खायला उठते असे कवि म्हणतो. रानाच्या पार्श्वभूमीवर साकारलेली ही कविता आपणास प्रत्यक्ष रानात घेऊन जाते. यातून व्यक्त होणारा ग्रामीण जीवनावरील प्रकट चिंतनाचा झालेला विचार ह्या ठिकाणी महत्त्वाचा ठरतो.

जिने आजपर्यंत अनेक संकटे पार केली, आम्ही जिच्याजवळ आमची दु:खे, संकटे सांगितली आणि तिने आमच्यात संकटांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास निर्माण केला ती आई जेव्हा संसार सोडून पंढरीला निघून गेली. तिच्या या जाण्याची हृदयद्रावक आठवण सांगताना महानोर म्हणतात,

**काडीचाही लोभ ठेवला नाहीस आई ....**
**माझ्यातही तुझा जीव अडखळला नाही**
**पुष्कळ अडवलं तुला**
**दर मुक्काम, दर कोस, दिंडीत तु दूरवर निघून गेलीस ....**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ४६)

आईने जाताना कशाचीही अपेक्षा न करता मुलं-बाळं संसार या मायाजाळात न गुंतता विठोबाच्या चरणी आपला संसार ठेऊन तिने जीवनप्रवास संपविला आहे. दिंडीतून निघून गेलेली आई जेव्हा वाळवंटात भेटली तेव्हा तिने घरची कसलीही चौकशी केली नाही. मात्र महानोरांच्या गळ्यात पडून ती रडजली. यातून 'आई' या दोन अक्षरी शब्दाचे मोठेपण व्यक्त होते.

विठोबाच्या मंदिरातील गरूड खांबासमोर आईने महानोरांना म्हणावयास सांगितलो अभंग म्हणताना त्यांना भरून आलेला कंठ म्हणजे जीवनातील अर्थ उमगल्याची जाणीवच होती असे महानोर स्पष्ट करतात. ही कविता आपणाला भावनिकतेच्या उच्च पातळीवरून समजाऊन घ्यावी लागते. जीवन जगताना परमेश्वर हाच शेवटी सर्वांचा वाली असल्याने ही कविता परमार्थाशिवाय जीवन व्यर्थ असल्याची साक्ष देते.

यानंतर येणारी एकोणतिसावी कविता सुद्धा आईच्याच आठवणीतून उतरली असून पूर्वीच्या काळातील समाजातील लोकवागणूक आणि वर्तमानकाळातील लोकवागणूक यात सुधारणा होण्याऐवजी देशची एकूणच ऱ्हासाकडेच होत चाललेली प्रगती सांगून कविच्या आईच्या न्यायी स्वभावाची चर्चा या कवितेतून झाली आहे.

कुणा तीसेक वर्षाच्या विधवेवर एकजणाने दिवसा-ढवळ्या बलात्कार केला. गावातील माणसांनी त्याला चोप दिला. पण भ्रष्टाचाराने पोखरलेल्या राजकारण्यांच्या मध्यस्तीने पोलिसांनी निरपराध माणसाला मारल्याच्या बनाव करीत गावालाच अटक करण्याचे षडयंत्र रचले.

यावेळी कवीच्या आईने गावातील बायकांना जमा करून तेथे आलेल्या पोलिस अधिकाऱ्याला तेथे घडलेली वास्तव परिस्थिती निदर्शनास आणून दिल. मोघलाई, निजामशाहीत देखील असे कधी वाईट न घडल्याचे सांगत त्या नराधमाला दिलेला चोप हा न्याय्यच असल्याचे प्रतिपादन केले आहे. एवढे होऊनही त्या विधवेच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याऐवजी त्या विधवेचा राजकीय पुढाऱ्यांच्या मध्यस्तीने पोलिस करत असलेल्या पंचनाम्याविरुद्ध बंड करीत,

**आमीनसाब**
**तुम्हाला आई असणार, आणखी बायकोसुद्धा**
**त्यांना हिच्या अंगावरच्या जखमा मोजायला लावीन**
**मांडीपासून उभाच न राहणारा तिचा पाय .....**
**तिला तिचा पाय कोण देणार ?**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**याहीपेक्षा साहेब,**

**आत्महत्येच्या वाटेनं निघालेल्या तिच्या आयुष्याच काय ?**

**या सगळ्याचा जाब मी ठाण्यावरच विचारणार हाय**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ४९)

अशा बाणेदार शब्दातील सडेतोडपणा आणि एक स्त्री असून पोलिसांना हुसकावून लावण्याची अंगी असलेली ताकद यातून स्त्री अन्यायाविरुद्ध किती पेटून उठते याचा दाखला ही दीर्घ कविता देऊन जाते. पैश्याच्या जोरावर 'सत्य' विकत घेऊ पाहणाऱ्या प्रस्थापितांना ही कविता चपराक ठरते.

प्रामुख्याने शेतीवर आधारित असलेल्या देशात व महाराष्ट्रात पडलेल्या घोर दुष्काळाच्या वणव्याने माणसे, शेतीवाडी, पीकपाणी, माणसा-माणसांतील माणुसकी सारे छिन्न-विछिन्न करून टाकले. कित्येक खेडी उद्ध्वस्त झाली. खेड्यातील अनेकांनी उपजिविकेसाठी शहरांची वाट धरली. महागाई वाढल्याने दुष्काळाची झळ ग्रामीण भागाबरोबर तितक्याच तीव्रतेने शहरी भागातही जाणूव लागली. साऱ्यांचेच जीवन त्रस्त झाले. शेतकरी आत्महत्या करू लागले. अशाच एका आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटूंबाची करूणार्त कहाणी प्रस्तुत कविता संग्रहातील तिसाव्या क्रमांकाच्या दीर्घ कवितेतून अभिव्यक्त होते.

सारजाच्या घरधन्याने डोक्यावर वाढलेल्या कर्जाच्या बोज्यासाठी आत्महत्येचामार्ग स्विकारून आपली जीवितयात्रा संपवली. या आत्महत्येमागे ग्रामीण जीवनानुभवातील दाहक समस्यांचा लेखाजोखा मांडून निर्माण होणारी भयावह वास्तवदर्शी परिस्थिती निर्देशित केली आहे.

**एकदा एक मोटारगाडी वसुलीसाठी आली**

**व्याजासह लाखाचं वारंट लाऊन गेली**

**कोर्टामधील पैशांचा दावा दाखल झाला**

**तसा देव माणूस माझा राती गोळ्या खाऊन मेला**

**पोरी शपथ सांगते दादा, सोडणार नाही त्याला**

**ज्यानं माझ्या कुंकवाचा सत्यानाश केला**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ५१)

अशा वेधक शब्दांतून एकावर एक येणाऱ्या संकटांना त्रासून ग्रामीण भागातील शेतकऱ्याने केलेली आत्महत्या प्रस्तुत कवितेतून समोर आणून त्याद्वारे ग्रामीण वास्तवता अधिक प्रगल्भ व प्रभावीपणे मांडली आहे.

यानंतर येणाऱ्या एकतिसाव्या कवितेतून स्वातंत्र्यानंतर तीन-चार दशकात राजकारण्यांचा स्वार्थ आणि भ्रष्टाचार यांनी संस्कृतीप्रधान देशाची लक्तरे वेशीवर टांगून देशाचे छिन्न-विछिन्न तुकडे करणाऱ्या शासनाच्या नाकर्तेपणावर तोफ डागली आहे. इंग्रजांच्या साखळदंडातून मुक्त होऊन देशाची प्रगतीऐवजी ऱ्हासाकडे होत चाललेली वाटचाल प्रामुख्याने या कवितेतून नोंदविली आहे.

प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या भारत देशात अब्जावधी हातांना काम मिळून देश सुखसमृद्धीत नांदण्याची आशा सफल न ठरता सत्तेच्या लालसेने झपाटलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या राजकीय पक्षाचे झेंडे चौकाचौकात रोवून आपल्या अस्तित्वाचा पाया भक्कम केला आहे. आलटून-पालटून हे नाही तरी ते राज्यकर्ते निवडून येऊन देश चालवितात. निवडून आलेल्या कोणत्याही शासनाला अद्याप तरी आपल्या शेतीप्रधान देशात शेती-पाणी याबद्दल समाधानकारक नियोजन करता आले नाही. चांगल्या विकास योजना राबविण्याची अपेक्षा सत्ताधाऱ्यांकडून केली जाते. मात्र या सत्ताधाऱ्यांमधून चांगल्या विकास योजना राबविणाऱ्याचीच कायमच्या बंदोबस्ताची योजना तयार केली जात असल्याची खंत येथे व्यक्त होते. सत्तेच्या माध्यमातून येणारा पैसा गोळा करून आपापली घरे तुडूंब भरण्याच्या याच प्रवृत्तीने शेतीवर आधारलेल्या या देशात शेतकऱ्यांच्या कष्टाला, त्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही. याच्याबद्दल शासनाला कसलीच फिकीर नाही.

निवडणुका जवळ येताच जनतेसमोर आश्वासनांची खैरात करून जनतेला लुबाडण्याचा कार्यक्रम राबविणाऱ्या या साळसूद माणसांनी पैश्याच्या जीवावरती मिळवलेली राजवर्खी सिंहासने सोडून कधी जनतेची साधी चौकशीही केलेली नसते. स्वदेशीच्या असणाऱ्या शेतीच्या नियोजनाकडे दुर्लक्ष करून परदेशातून आलेल्या क्रिकेटच्या खेळावर कोट्यावधी रूपयांचा उदोउदो करणाऱ्या या राज्यकर्त्यांना 'रयतेचे राजे' म्हणून घेण्याचा कोणताही नैतिक आधार उरत नसल्याची स्पष्ट ताकीद कवितेच्या माध्यमातून परखडपणे बोलून दाखविली आहे.

**पोटाला चार भाकरी बांधून कधीच भूक भागत नसते.**
**फक्त चतकोर भाकरी प्रत्यक्षात पोटात पाहीजे असते**
**चिरगुटे बांधून पोटाला कधीच गर्भारपण येत नसतं**
**हे सगळं खुद्द तुकोबानचं सांगून ठेवलय आम्हाला**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र.५५)

अशा खड्या बोलातून राज्यकर्त्यांची फसवेगिरी, त्यांचे साधूत्व आपणाला न दिसण्याइतपत आपण आंधळे नाही. हे जनतेच्या प्रातिनिधिक वतीने सांगून कृपा करून हे राज्यकर्त्यांनो ! तुम्ही निवडणुकांच्या तोंडावर चौकाचौकातून, रस्त्यारस्त्यांवर करत असलेली आश्वासनांच्या भाषणबाजींची तोंडपाटीलकी बंद करा.

या तुमच्या वागण्याने लोकशाहीचा कोणताही देश सक्षमपणे उभा राहू शकणार नसल्याचे सांगून प्रस्थापित राजकारणी पुढाऱ्यांच्या बोलघेवड्या दिखाऊपणाच्या पोकळ वृत्तीवर महानोरांनी अचूकपणे बोट ठेवले आहे.

स्वातंत्र्य मिळवताना मृत्यूमुखी पडलेल्या नेत्यांच्या नावाचे भांडवल करून मतांसाठी निवडणूकीत दारोदार फिरणाऱ्या या पुढाऱ्यांना आपण किती फसायचं असा प्रश्न करून सामान्य जनतेलाही महानोरांनी मोलाचा सल्ला दिला आहे.

आईच्या आठवणीतून आईशी संवाद साधताना कवि माणसाला आपले मत मांडण्याचा अधिकार घटनेने दिला असतानासुद्धा मी कवितेतून खरेपणा व्यक्त करतो म्हणून मला नेस्तनाबूत करण्याची, जीवे मारण्याची निनावी पत्रे येत असल्याचे आईला बोलून जातो.

**मला नेस्तनाबूत करणं तसं सोप आहे गं आई**
**पण ओठा ओठांवर रूतून बसलेल्या कवितेच्या ओळींच करणार काय ?**

(गंगा वाहू दे निर्मळ, पृ. क्र. ५६)

अशा पुढे येणाऱ्या काव्यपंक्तीतून मात्र निनावी पत्रे पाठविणारांचे खोटेपण जगजाहीर असल्याचे स्पष्ट केले आहे. सत्य हे कितीही लपवून ठेवले तरी ते बाहेर येतेच. हे त्रिकालाबाधित सत्य सर्वांसमोर मांडून या खोट्या लोकांच्या राज्यात मी मात्र माझ्या सुंदर आणि पवित्र देशासाठी दु:खित जीवांना सुखसमृद्धी मिळून प्रत्येकाच्या जीवनात आबादीआबाद आनंद मिळू देत अशी प्रार्थना करीत असल्याचे महानोर या कवितेतून सांगतात.

'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहातील शेवटी येणाऱ्या बत्तीसाव्या कवितेमधून शेतकऱ्याने कष्ट करून, घाम गाळून रूजविलेल्या दान्यांना पाऊस मिळाल्याने शेती सोन्यासारखी होऊन पूर्वीचे दारिद्रय संपले आहे. सगळीकडे आनंदाचे वातावरण असून परमेश्वराकडे आमच्यावर ही तुझी कृपा अशीच राहू दे असे सांगून,

**काळं बर्बट जळोनी**
**गंगा वाहू दे निर्मळ**
**लाख चांदण्या गोंदून**
**कधी भरून येऊ दे आभाळ**

(गंगा वाहू दे निर्मळ)

अशा वेधक शब्दातून ना. धों. महानोरांनी 'गंगा वाहू दे निर्मळ' या प्रस्तुत कविता संग्रहाच्या निमित्ताने परमेश्वराकडे प्रार्थना केली आहे. त्यांच्या इतरत्र आलेल्या कविता पाहता 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहातील ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितेचे स्वरूप त्यांच्या इतरत्र आलेल्या स्फूट कवितेंपेक्षा फारच बदललेले दिसून येते.

**निष्कर्ष :-**

१. स्फूट कवितेमधून निसर्ग, रानशेत, पाऊस अशा प्रतिमांमधून स्त्री-पुरुष रूपात एकरूप झालेले महानोर, या संग्रहातील दीर्घ कवितांच्या निमित्ताने जीवनानुभवात आलेल्या 'वास्तव' परिस्थितीला सरळ सामोरे जाताना दिसतात. वरचेवर पाण्यावाचून पडणारे दुष्काळ, उद्ध्वस्त झालेली खेडी आणि शासनव्यवस्थेकडून होत चाललेल्या दुर्लक्षाला 'लक्ष' करून खेड्यातील 'वास्तवतेचा' वेध घेणारी प्रश्नोप्रश्नातून तीव्र जाणिवांचे भान मांडणारी महानोरांची कविता उत्तरोत्तर अधिकच प्रगल्भ होऊन धारदारपणे प्रकट होताना दिसते.

२. 'प्रार्थना दयाघना', 'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहामूधन येणाऱ्या दीर्घ कवितांमधील वास्तवानुभवाचे चित्रण अचानकपणे प्रकट न होता महानोरांच्या 'रानातल्या कविता', 'वही', 'पावसाळी कविता' या अगोदर आलेल्या कवितासंग्रहातील कवितांमधून समाजवास्तवाचे भान अल्प प्रमाणात का होईना पण अविष्कृत झाल्याचे दिसते.

३. महानोरांच्या दीर्घ कवितांचा आशय पाहता त्यांनी बहुतेक कविता उपहास उपरोधाच्या अंगाने प्रकट होते.

४. महानोरांच्या दीर्घ कवितांचा आशय कोणत्याही सजावट प्रतिमांची झूल पांघरून अभिव्यक्त न होता ग्रामीण वास्तवाशी थेट भिडताना दिसतो.

५. महानोरांच्या दीर्घ कवितांमधील आशयातून केवळ वैयक्तिक वैफल्याचे दर्शन न होता त्यातून सामाजिक स्तरावर होणाऱ्या दुःखी जाणिवांचे भान प्रभावीपणे व्यक्त होते.

६. पावसाच्या आगमनाबद्दल चिवट श्रद्धा- आशावाद व्यक्त करणाऱ्या महानोरांच्या दीर्घ कविता ध्येय ध्यास  आणि उदात्त जीवनमूल्यांचा आशय शोधताना दिसतात.

७. ना. धों. महानोरांच्या दीर्घ कविता संग्रहातून त्यांची ग्रामीण पंढरी बद्दल असणारी एकूणच आस्था आणि त्यांच्या संवेदनशील मनाची होणारी घालमेल व्यक्त होते.

## संदर्भ सूची


१. महानोर ना. धों. : 'प्रार्थना दयाघना', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९०

२. महानोर ना. धों. : 'गंगा वाहू दे निर्मळ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००७


----x----